# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** बॅनर्जी लेआऊट, नागपूर येथील म.न.पा.च्या मराठी प्राथमीक
**{मालमत्ता विभाग}** शाळेची इमारत रुखमन पात्र मेमोरीयल सोसायटीचे सॅक्रेड स्कुल ला देण्यात आलेली आहे. याच परिसरातील व्यायामशाळा इमारत व वाचनालय इमारतीची मागणी अर्जदारानी केलेली होती.

त्यानुसार बॅनर्जी लेआऊट नागपूर येथील म.न.पा. च्या मराठी प्राथमीक शाळेच्या तळमजल्यावरील व पहिल्या मजल्यावरील 6 खोल्या रू. 18,135/— प्रमाणे मासीक भाडे आकारून शिक्षण विभागाव्दारे शाळा इमारत म.न.पा. ठराव क्र. 171 दि. 26.10.2015 रोजीच्या मंजुरीन्वये 5 वर्षाकरीता भाड्याने देण्यात आली आहे. उपरोक्त शाळा परिसरातील शाळेशिवाय असलेली व्यायामशाळा व वाचनालयाची इमारत भाडयाने देण्याची मागणी संस्थेव्दारे करण्यात आली असून याआधी या दोन्ही इमारती भाडयाने देण्यात आलेल्या नाहीत.

सबब मौजा बाबुलखेडा, बॅनर्जी लेआऊट नागपूर येथील भगवाननगर मराठी प्राथमिक शाळा परिसरातील व्यायामशाळा इमारत (बांधीव क्षेत्र 78.08 चौ.मी.) व वाचनालय इमारत (बांधीव क्षेत्र 33.80 चौ.मी.) या इमारती रुखमन पात्र मेमोरियल सोसायटी चे सॅक्रेड स्कूल यांना शैक्षणिक वापराकरीता अनुक्रमे रु. 9,360/— प्रति महिना व रु. 4,056/— प्रति महिना नुसार प्रथम 11 महिन्यांचे कालावधीकरीता आगावु भाडे भरण्याचे अटींवर प्रथम पाच वर्षाकरीता खालील नमूद अटीं व शर्थीवर भाडेतत्वावर देण्यास स्थायी समिती ठराव क्र. 154 दि. 25.06.2018 अन्वये म.न.पा. सभागृहाच्या मंजुरीकरीता पाठविण्याच्या शिफारशीसह मंजुरी प्रदान केलेली आहे.

त्यानुसार मनपा ठराव क्र. 373 विषय क्र. 318 दि. 05.03.2019 ला सदर विषय महासभेपुढे ठेवण्यात आला असता, सदर विषयान्वये शाळा परिसरातील व्यायाम शाळा, इमारत, (बांधिव क्षेत्र 78.08 चौ.मी.) व वाचनालय इमारत (बांधिव क्षेत्र 33.80 चौ.मी. क्षेत्राची इमारत भाडेपट्ट्याने देणेबाबत प्रस्तावित करण्यात आली. व त्या अनुषंगाने ठराव मंजुर करण्यात आले. ठरावामध्ये मान्यता देतांना फक्त शाळेचा इमारतीचा उल्लेख असून वाचनालय व व्यायामशाळा देण्याचे स्पष्ट उल्लेख केले नसल्याने ठरावाची व्याख्या करतांना मतभिन्नता येत आहे. करीता विषयांकित प्रकरणी संदिग्धता दूर होणे हेतू नव्याने निर्णय होणेची गरज आहे. यास्तव खालील प्रमाणे ठराव होणे हेतू प्रस्तावित आहें.

मौजा बाबुलखेडा, बॅनर्जी लेआऊट नागपूर येथील भगवाननगर मराठी प्राथमिक शाळा करिता नगर रचना विभागाद्वारे केलेल्या मुल्याकंनानुसार परिसरातील तळमजल्यावरील व पहिल्या मजल्यावरील 6 खोल्या रू. 45,608/— प्रमाणे मासीक भाडे तसेच व्यायामशाळा इमारत (बांधीव क्षेत्र 78.08 चौ.मी.) व वाचनालय इमारत (बांधीव क्षेत्र 33.80 चौ.मी.) या इमारती रुखमन पात्र मेमोरियल सोसायटी चे सॅक्रेड स्कूल यांना शैक्षणिक वापराकरीता अनुक्रमे रु. 23,535/— प्रति महिना व रु. 10,278/— प्रति महिना नुसार महाराष्ट्र शासन अधिसुचना दि. 13.09.2019 अन्वये 10 वर्षाकरीता दि. 26.10.2020 पासून दि. 25.10.2030 पर्यंत खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वापराकरीता प्रस्तावित आहे.

**<u>अटीं व शर्थी :—</u>**

१. विषयांकित इमारतीची संयुक्त पाहणी स्थावर विभाग, शिक्षण विभाग व संबंधित संस्था यांचे प्रतिनीधी यांनी ताबा देण्याचे पूर्वी/ताबा परत घेण्याचे पूर्वी करुन, सविस्तर अहवाल तयार करणे.
२. सदर संस्थेला 11 महिन्यांचे एकुण भाडे आगावू भरणे बंधनकारक राहील.

३. सदरील संस्थेस इमारत देखभाल/दुरुस्तीसाठी रु. 20,000/– सुरक्षा ठेव महानगरपालिके कडे जमा करावी लागेल.
४. इमारत परत करण्यापुर्वी सदर संस्थेनी संयुक्त पाहणी अहवालाप्रमाणे किमान आहे त्यास्थितीत महानगरपालिकेस परत करतील. याबाबत सदर संस्थेने हमीपत्र देणे बंधनकारक राहील.
५. इमारत महानगरपालिकेस परत करते वेळी ज्यास्थितीत भाड्यावर घेतलेली होती त्या स्थितीत असल्यास सुरक्षा ठेव परत केली जाईल अन्यथा आवश्यकतेनुसार सुरक्षा ठेव मध्ये कपात केली जाईल.
६. सदर जागेचा व इमारतीचा उपयोग फक्त शैक्षणीक वापराकरीताच करण्यात येईल.
७. महानगरपालिकेला सदर जागा/इमारतीची आवष्यकता भासल्यास, त्या स्थितीत 30 दिवसांचे पुर्व सुचनेवर जागा/इमारत परत घेण्यात येईल.
८. इमारतीच्या बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरबदल करता येणार नाही.
९. सदर जागेची व इमारतीची देखभाल व दुरुस्ती तसेच विद्युत, पाणी याबाबतची जबाबदारी संस्थेची राहील.
१०. उपरोक्त बाबत कोणत्याही निर्णया संबंधित संपुर्ण अधिकार मा. आयुक्त यांचेकडे सुरक्षित राहील व संस्थेस बंधनकारक राहील.

करिता उक्त प्रस्ताव विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 523/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 06/09/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (मालमत्ता), मालमत्ता विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार बॅनर्जी लेआऊट, नागपूर येथील म.न.पा.च्या मराठी प्राथमीक शाळेची इमारत रुखमन पात्र मेमोरीयल सोसायटीचे सॅक्रेड स्कुल ला देण्यात आलेली आहे. याच परिसरातील व्यायामशाळा इमारत व वाचनालय इमारतीची मागणी अर्जदारानी केलेली होती.

त्यानुसार बॅनर्जी लेआऊट नागपूर येथील म.न.पा. च्या मराठी प्राथमीक शाळेच्या तळमजल्यावरील व पहिल्या मजल्यावरील 6 खोल्या रू. 18,135/– प्रमाणे मासीक भाडे आकारून शिक्षण विभागाव्दारे शाळा इमारत म.न.पा. ठराव क्र. 171 दि. 26.10.2015 रोजीच्या मंजुरीन्वये 5 वर्षाकरीता भाड्याने देण्यात आली आहे. उपरोक्त शाळा परिसरातील शाळेशिवाय असलेली व्यायामशाळा व वाचनालयाची इमारत भाडयाने देण्याची मागणी संस्थेव्दारे करण्यात आली असून याआधी या दोन्ही इमारती भाडयाने देण्यात आलेल्या नाहीत.

सबब मौजा बाबुलखेडा, बॅनर्जी लेआऊट नागपूर येथील भगवाननगर मराठी प्राथमिक शाळा परिसरातील व्यायामशाळा इमारत (बांधीव क्षेत्र 78.08 चौ.मी.) व वाचनालय इमारत (बांधीव क्षेत्र 33.80 चौ.मी.) या इमारती रुखमन पात्र मेमोरियल सोसायटी चे सॅक्रेड स्कूल यांना शैक्षणिक वापराकरीता अनुक्रमे रु. 9,360/– प्रति महिना व रु. 4,056/– प्रति महिना नुसार प्रथम 11 महिन्यांचे कालावधीकरीता आगावु भाडे भरण्याचे अटींवर प्रथम पाच वर्षाकरीता खालील नमूद अटीं व शर्थींवर भाडेतत्वावर देण्यास स्थायी समिती ठराव क्र. 154 दि. 25.06.2018 अन्वये म.न.पा. सभागृहाच्या मंजुरीकरीता पाठविण्याच्या शिफारशीसह मंजुरी प्रदान केलेली आहे.

त्यानुसार मनपा ठराव क्र. 373 विषय क्र. 318 दि. 05.03.2019 ला सदर विषय महासभेपुढे ठेवण्यात आला असता, सदर विषयान्वये शाळा परिसरातील व्यायाम शाळा, इमारत, (बांधिव क्षेत्र 78.08 चौ.मी.) व वाचनालय इमारत (बांधिव क्षेत्र 33.80 चौ.मी. क्षेत्राची इमारत भाडेपट्ट्याने देणेबाबत प्रस्तावित करण्यात आली. व त्या अनुषंगाने ठराव मंजुर करण्यात आले. ठरावामध्ये मान्यता देतांना फक्त शाळेचा इमारतीचा उल्लेख असून वाचनालय व व्यायामशाळा देण्याचे स्पष्ट उल्लेख केले नसल्याने ठरावाची व्याख्या करतांना मतभिन्नता येत आहे. करीता विषयांकित प्रकरणी संदिग्धता दूर होणे हेतू नव्याने निर्णय होणेची गरज आहे. यास्तव खालील प्रमाणे ठराव होणे हेतू प्रस्तावित आहें.

मौजा बाबुलखेडा, बॅनर्जी लेआऊट नागपूर येथील भगवाननगर मराठी प्राथमिक शाळा करिता नगर रचना विभागाद्वारे केलेल्या मुल्याकंनानुसार परिसरातील तळमजल्यावरील व पहिल्या मजल्यावरील 6 खोल्या रू. 45,608/– प्रमाणे मासीक भाडे तसेच व्यायामशाळा इमारत (बांधीव क्षेत्र 78.08 चौ.मी.) व वाचनालय इमारत (बांधीव क्षेत्र 33.80 चौ.मी.) या इमारती रुखमन पात्र मेमोरियल सोसायटी चे सॅक्रेड स्कूल यांना शैक्षणिक वापराकरीता अनुक्रमे रु. 23,535/– प्रति महिना व रु. 10,278/– प्रति महिना नुसार महाराष्ट्र शासन अधिसुचना दि. 13.09.2019 अन्वये 10 वर्षाकरीता दि. 26.10.2020 पासून दि. 25.10.2030 पर्यंत खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वापराकरीता प्रस्तावित आहे.

**<u>अटीं व शर्थी :–</u>**

१. विषयांकित इमारतीची संयुक्त पाहणी स्थावर विभाग, शिक्षण विभाग व संबंधित संस्था यांचे प्रतिनीधी यांनी ताबा देण्याचे पूर्वी/ताबा परत घेण्याचे पूर्वी करुन, सविस्तर अहवाल तयार करणे.
२. सदर संस्थेला 11 महिन्यांचे एकुण भाडे आगावू भरणे बंधनकारक राहील.
३. सदरील संस्थेस इमारत देखभाल/दुरुस्तीसाठी रु. 20,000/– सुरक्षा ठेव महानगरपालिके कडे जमा करावी लागेल.
४. इमारत परत करण्यापुर्वी सदर संस्थेनी संयुक्त पाहणी अहवालाप्रमाणे किमान आहे त्यास्थितीत महानगरपालिकेस परत करतील. याबाबत सदर संस्थेने हमीपत्र देणे बंधनकारक राहील.
५. इमारत महानगरपालिकेस परत करते वेळी ज्यास्थितीत भाड्यावर घेतलेली होती त्या स्थितीत असल्यास सुरक्षा ठेव परत केली जाईल अन्यथा आवश्यकतेनुसार सुरक्षा ठेव मध्ये कपात केली जाईल.
६. सदर जागेचा व इमारतीचा उपयोग फक्त शैक्षणीक वापराकरीताच करण्यात येईल.
७. महानगरपालिकेला सदर जागा/इमारतीची आवष्यकता भासल्यास, त्या स्थितीत 30 दिवसांचे पुर्व सुचनेवर जागा/इमारत परत घेण्यात येईल.
८. इमारतीच्या बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरबदल करता येणार नाही.
९. सदर जागेची व इमारतीची देखभाल व दुरुस्ती तसेच विद्युत, पाणी याबाबतची जबाबदारी संस्थेची राहील.
१०. उपरोक्त बाबत कोणत्याही निर्णया संबंधित संपुर्ण अधिकार मा. आयुक्त यांचेकडे सुरक्षित राहील व संस्थेस बंधनकारक राहील.

उपरोक्त प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**